**SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR - 416 004. MAHARASHTRA**
PHONE : EPABX-2609000 PGBUTR – 2609139 FAX +91-0231-2691533 & 2692333 website: www.unishivaji.ac.in
Estd : 1962
**शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर - ४१६ ००४, महाराष्ट्र**
NAAC 'A' Garde
दुरध्वनी :(ईपीएबीएक्स) २६०९०००, (पी.जी.बी.यु.टी.आर.) २६०९१३९ फॅक्स : +९१-०२३१-२६९१५३३ व २६९२३३३. e-mail : pgbutr@unishivaji.ac.in

संदर्भ क्र. शिवाजी विद्या./पीजी-बीयुटीआर/पीएच.डी./ 1273

दि. 19 MAR 2021

प्रति,

प्राचार्य / संचालक,
सर्व संलग्न महाविद्यालय व मान्यताप्राप्त संस्था,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.

विषय - एम. फिल. / पीएच. डी. अभ्यासक्रमाचे अधिकचे शुल्क आकारणीबाबत...

संदर्भ - या कार्यालयाकडील क्र. शिवाजी वि./पीजीबीयुटीआर/पीएच.डी./८२१७ दि. ०४ डिसेंबर, २०१२ रोजीचे परिपत्रक

महोदय / महोदया,

उपरोक्त विषयसंदर्भात आपणांस आदेशान्वये कळविण्यात येते की, आपल्या महाविद्यालयातील / संशोधन केंद्रामधील पीएच. डी. अभ्यासक्रमासाठी संशोधन करणाऱ्या विद्यार्थ्यांकडून सदर अभ्यासक्रमासाठी अधिकचे शुल्क आकारणी केले जात असल्याबाबत या कार्यालयास वारंवार तक्रारी प्राप्त होत आहेत.

उपरोक्त संदर्भाधीन परिपत्रकान्वये वार्षिक शुल्कातील नमूद टक्केवारीनुसार विद्यार्थ्यांनी विद्यापीठाकडे भरलेल्या फी मधून संशोधन केंद्र यांना काही प्रमाणात वर्ग करण्याची तरतूद दिसून येते. (सोबत परिपत्रकाची छायांकित प्रत माहितीस्तव)

तेंव्हा यासंदर्भात आदेशान्वये कळविण्यात येते की, संबंधीत विद्यार्थ्यांकडून कोणतेही अधिकचे शुल्क संबंधीत महाविद्यालयास / संशोधन केंद्रास आकारता येणार नाही.

तेंव्हा सदर परिपत्रकातील तरतूदींचे तंतोतंत पालन करण्यात यावे. त्याचप्रमाणे पीएच.डी. विद्यार्थ्यांकडून आपल्या महाविद्यालयामार्फत अथवा संशोधन केंद्रामार्फत अधिकचे शुल्क आकारणेत आले असल्यास, त्याची माहिती तात्काळ या कार्यालयास सविस्तर अभिप्रायासहीत पाठविण्यात यावी.

आपली विश्वासू,

उपकुलसचिव

सोबत - वरीलप्रमाणे

D:\SHEKHAR JAN.2020 onwards\letters.2020

SHIVAJI UNIVERSITY,KOLHAPUR-416 004, MAHARASHTRA
PHONE :EPABX-2690571 (10 lines), 2693643(9 lines), 2693730 (9 lines)
GRAM: UNIVSHIVAJI FAX :0091-0231-2691533 & 0091-02312692333
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर—416 004 महाराष्ट्र
दूरध्वनी : (ईपीएबीएक्स) 2690571 (दहा लाईन्स), पीजी बीयुटीआर विभागाचा दुरध्वनी 0231—2609139,
तार : युनि शिवाजी फॅक्स : 0091—0231—691533 व 0091 — 0231—2692333 pgbutr@unishivaji.ac.in
B
Accredited by NAAC
(2009)

शिवाजी वि/पी.जी.बी.यु.टी.आर/पीएच.डी./8217 दिनांक : 14 DEC 2012

## परीपत्रक

विद्यापीठ अधिकार मंडळाच्या निर्णयानुसार आदेशान्वये कळविणेत येते की, शिवाजी विद्यापीठाशी सलंग्नीत असलेल्या महाविदयालयातील पीएच.डी. मान्यताप्राप्त प्रयोगशाळा व मान्यताप्राप्त संशोधन केंद्रामध्ये पीएच.डी साठी नोंदणी झालेल्या विद्यार्थ्यांच्या शुल्कामधील खालीलप्रमाणे शुल्क शैक्षणिक वर्ष 2012–13 पासून पूढील अटींच्या अधिन राहून वर्ग करणेत येईल.

1. विज्ञान / अभियांत्रिकी विद्याशाखा
   - अ. प्रयोगशाळा शुल्क – 65 टक्के
   - ब. ग्रंथालय शुल्क – 50 टक्के
   - क. इंटरनेट शुल्क – 50 टक्के
   - ड. प्रयोगशाळा विकास शुल्क – 65 टक्के
2. शास्त्र / अभियांत्रिकी विद्याशाखा वगळता इतर विद्याशाखेच्या विद्यार्थ्यांच्या शुल्कामधून वर नमूद केलेल्या शुल्कापैकी "ब" व "क" प्रमाणे शुल्क संबंधीत महाविद्यालय / संशोधन केंद्रास वर्ग करण्यात येईल.
3. सदरचे शुल्क संबंधित विद्यार्थ्यांकडून विद्यापीठास प्राप्त झालेपासून दोन महिन्यांमध्ये संबंधित महाविद्यालय / संशोधन केंद्राकडे वर्ग केले जाईल.

अटी :-

1. महाविद्यालय / संशोधन केंद्र यांना प्राप्त झालेल्या शुल्काचा विनियोग संशोधनाच्या निगडित बाबींवर करावा व महाविद्यालयात/संशोधन केंद्राकडे कार्यरत असणा-या संशोधकांना या निधीमधून योग्य त्या सुविधा उपलब्ध करुन देण्यात याव्यात.
2. मान्यताप्राप्त महाविद्यालय व संशोधन केंद्र येथील संशोधकांना विद्यापीठामधील ग्रंथालय व इंटरनेट विभागातील सुविधा पुर्वीप्रमाणे देण्यात याव्यात.
3. संबंधित प्रयोगशाळा / संशोधन केंद्रे यांनी अशा निधीमधून निर्माण करण्यात येणा-या सुविधांच्या योग्य त्या नोंदी ठेवाव्यात.
4. महाविद्यालयाने / संशोधन केंद्राने सदर शुल्काचा उपयोग संबंधीत मार्गदर्शकांच्या शिफारशीनुसार करावा.
5. महाविद्यालयाने / संशोधन केंद्राने वर्ग केलेल्या शुल्काचे विनियोग दाखले मा. प्राचार्य / संचालक यांच्या सहीने विद्यापीठ प्रशासनास (पी.जी.बी.यु.टी.आर. विभागाकडे) प्रत्येक शैक्षणिक वर्षाच्या शेवटी सादर करावेत.

संचालक,
महाविदयालय व विद्यापीठ विकास मंडळ

प्रती,
प्राचार्य / संचालक,
सर्व संलग्न महाविदयालय व मान्यताप्राप्त संस्था,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर